**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

मी शपथेवर सत्यकथन करतो की,

माझे नाव – ब्रम्हानंद बालाजी शिंदे,

वय:– ४० वर्षे, धंदा:– नोकरी,

राहणार:– जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर.

**वादी यांचा अतिरीक्त सरतपास वादीचे विधिज्ञ एन. एल. बोरा यांचे मार्फत शपथेवर सुरु:–**

मी प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादींना ओळखतो. त्यांचे नाव जयश्री सचिन अवसारे असून त्या संस्कृती जनरल स्टोअरच्या प्रोप्रायटर आहेत. मी जयश्री यांना ओळखतो कारण त्यांनी आमच्या शाखेतून कर्ज घेतले आहे. प्रस्तुत प्रकरणात मी पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर मला वाचुन दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला. तो बरोबर असल्याने मी त्यावर सही केली आहे तसेच त्यावर बँकेचा शिक्का आहे. प्रस्तुत साक्षीदाराने त्याचे पुराव्याचे शपथपत्र शपथेवर सत्यापीत केल्याने त्यास वादीचा सरतपास म्हणून स्विकारण्यात येत आहे. सदर पुराव्याचे शपथपत्रास निशाणी क्रमांक १७ देण्यात आलेली आहे.

**०२.** मी निशाणी क्रमांक १३ लगत माझे नियुक्तीपत्र व ओळखपत्र दाखल केले आहेत. आता मला सदरचे नियुक्तीपत्र व ओळखपत्र दाखविण्यात आले. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर नियुक्तीपत्र व ओळखपत्रास अनुक्रमे **निशाणी क्रमांक १८ व १९** देण्यात येत आहे.

**०३.** त्यानंतर मी सदर प्रकरणामध्ये निशाणी क्रमांक १३ लगत बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी शाखाअधिकारी यांना न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी दिलेले अधिकारपत्र दाखल केलेले आहे. आता मला सदरचे अधिकारपत्र दाखविण्यात आले. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर जनरल मॅनेजर, रिकव्हरी ॲण्ड लिगल सर्व्हीसेस यांची डिजीटल सिग्नेचर आहे. त्यावर श्री सदर्शन खडके यांची बँकेचे शाखा प्रबंधक म्हणून सही व बँकेचा शिक्का आहे. सदर अधिकारपत्रास **निशाणी क्रमांक २०** देण्यात येत आहे.

**०४.** मी प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्रमांक ०३ लगत प्रतिवादी क्रमांक ०१ चे नावाचा दिनांक २९/०३/२०२३ रोजीचे कर्ज खातेउतारा दाखल केला आहे. त्यावर बँकेचा शिक्का व आमच्या बँकेचे पूर्व शाखाअधिकारी श्री. सुदर्शन खडके यांची सही आहे. आता मला सदरचा कर्जखातेउतारा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर कर्जखातेउताऱ्यास **निशाणी क्रमांक २१** देण्यात येत आहे.

**०५.** तसेच मी भारतीय सुरक्षा अधिनियम ६५ बी चे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यावर श्री सदर्शन खडके यांची बँकेचे शाखा प्रबंधक म्हणून सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व

बरोबर आहे. सदर प्रमाणपत्रास **निशाणी क्रमांक २२** देण्यात येत आहे.

**०६.** त्यानंतर मी जयश्री सचिन अवसरे यांना दिलेले कर्ज हे त्यांच्या कर्ज मागणीच्या अर्जावरुन देण्यात आले होते. सदर अर्जावर जयश्री अवसरे यांची कर्जदार म्हणून सही व बँकेचे शाखाव्यवस्थापक यांची सही आहे. सदर कर्जमागणीच्या अर्जास **निशाणी क्रमांक २३** देण्यात येत आहे.

**०७.** त्यानंतर मी दिनांक ०६/०६/२०१९ रोजीचे जयश्री अवसरे यांनी करुन दिलेले हमीपत्र दाखल केले. आता मला सदरचे हमीपत्र दाखविण्यात आले. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर जयश्री अवसरे यांची व बँकेचे शाखाव्यवस्थापक यांच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्रमांक २४** देण्यात येत आहे.

**०८.** त्यानंतर मी दिनांक ०६/०६/२०१९ रोजीचे नजरगहाणखत (हायपोथीकेशन डीड) दाखल केले आहे. आता मला सदरचे नजरगहाणखत (हायपोथीकेशन डीड) दाखविण्यात आले. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर कर्जदार जयश्री अवसरे यांची सही आहे. सदर नजरगहाणखत (हायपोथीकेशन डीड) **निशाणी क्रमांक २५** देण्यात येत आहे.

**०९.** त्यानंतर दिनांक १४/०४/२०२२ रोजीचे पुर्नजिवीकरणपत्र दाखल केले आहे. आता मला सदरचे पुर्नजिवीकरणपत्र दाखविण्यात आले. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर जयश्री अवसरे यांची व बँकेचे शाखाव्यवस्थापक यांच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्रमांक २६** देण्यात येत आहे.

**१०.** त्यानंतर मी दिनांक ०६/०६/२०१९ रोजीची डिमांड प्रॉमिसरी नोट दाखल केली आहे. आता मला सदरची डिमांड प्रॉमिसरी नोट दाखविण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर कर्जदार म्हणून जयश्री अवसरे यांची सही आहे. सदर डिमांड प्रॉमिसरी नोट हिस **निशाणी क्रमांक २७** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/-

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः- २३/१२/२०२५
ठिकाणः- जामखेड

**(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)**